# पाण्याची बचत

**स्वयंपाक घरात अशी करा पाण्याची बचत -**

- भाज्या अथवा फळे धुण्यासाठी वापलेले पाणी साठवून ठेवा आणि ते झाडांना घाला.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रत्येकाच्या घरात डिश वॉशर असतात. मात्र तुम्ही वापरात असलेले डिश वॉशर जास्त पाण्याचा वापर करत आहे का हे जरूर तपासा असं असल्यास डिश वॉशरचा वापर कमी प्रमाणात करा.
- शक्य असल्यास भांडी हाताने स्वच्छ करण्याचा प्रयत्न करा.या पद्धतीमुळे पाण्याचा वापर कमी करता येऊ शकतो.
- भांडी घासताना नळ सुरु ठेवू नका.
- भाज्या अथवा फळे नळा खाली धुण्या ऐवजी ती एखाद्या भांड्यात घेऊन धुण्याचा प्रयत्न करा ज्यामुळे पाणी कमी प्रमाणात वापरले जाईल.

**कपडे धुताना हे घ्या काळजी -**

- कमी कपडे धुण्यासाठी वॉशिंग मशीनचा वापर करू नका, मशिनच्या क्षमतेनुसार त्यात कपडे धुण्यासाठी घ्या. गरज नसेल तर कपडे कोरडी ठेवा व ते साठल्यानंतर मशीन चा वापर करा. गरज नसताना अथवा कमी कपड्यांसाठी मशीन वापरल्यामुळे पाणी वाया जाण्याची शक्यता अधिक असते.
- कपडे वारंवार धुणे टाळा दिवसातून एकदाच कपडे धुवा.
- कपडे धूत असताना पाण्याचे नळ सुरू ठेवू नका. कपडे धुण्यासाठी बादलीचा वापर करा ज्यामुळे कमी प्रमाणात पाणी वापरता येईल.
- कपडे धुतल्यानंतर राहिलेले पाणी गाडी धुण्यासाठी अंगण अथवा व्हरंडा, टेरेस बाल्कनी धुण्यासाठी वापरू शकता.
- कपडे धुतलेले पाणी बाथरूम स्वच्छ करण्यासाठी अथवा टॉयलेट फलश करण्यासाठी वापरा ज्यामुळे पाण्याचा अपव्यय होणार नाही
- गाडी स्वच्छ करण्यासाठी बादलीचा वापर करा. पाण्याची पाईप वापरून गाडी धुतल्यास पाणी वाया जाण्याची शक्यता अधिक असते. दररोज गाडी धुण्यापेक्षा आठवड्यातून दोन ते तीन वेळा गाडी धुवा. इतर वेळी गाडी फक्त कापडाने पुसून घ्या.

**बाथरूम मध्ये अशी करा पाण्याची बचत.**

- आंघोळीसाठी नळ अथवा शॉवरचा वापर करण्यापेक्षा बादलीत पाणी घेऊन त्याने आंघोळ करा. ज्यामुळे आंघोळीसाठी कमी पाण्याचा वापर केला जाईल.
- दात घासताना बेसिनचा नळ बंद करा. कारण काही लोकांना ब्रश करत असताना बेसिनचा नळ तसाच सुरू ठेवण्याची सवय असते. यामुळे पाणी वाया जाते यासाठी फक्त चूळ भरताना नळ सुरू ठेवा.
- बेसिनमध्ये हाता अथवा तोंड धुताना पाण्याचा नळ तसाच सुरू ठेवू नका. हात अथवा तोंडाला फेसवॉश,हँडवॉश लावताना नळ बंद ठेवा आणि फक्त हात अथवा तोंड धुताना नळ पुन्हा सुरू करा.
- बाथरूम मध्ये जर एखादा नळ अथवा पाईप लिकेज असेल तर त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करा.
- दाढी करताना बरेच लोकांना बेसिनचा नळ तसाच सुरू ठेवण्याची सवय असते शक्य असल्यास पाणी एखाद्या भांड्यात घेऊन दाढी करा.
- घरातील बाथरूम मध्ये नव्या तंत्र्याचा वापर केलेले नळ वापरा. ज्यामधून कमी पाणी जास्त वेगात बाहेर पडते अशा तंत्रज्ञानामुळे पाणी कमी वापरले जाते. शिवाय आजकाल काही ठराविक प्रमाणात पाणी सोडल्यावर आपोआप बंद होणारे नळ असतात या नळामुळेही पाणी कमी वापरले जाते.
- टॉयलेटमधील फ्लशमध्ये वापरण्यात येणार पाणी हे शक्य असल्यास पुनर्वापर केलेले असेल याचे काळजी घ्या फ्लश मधून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर केला जातो. बऱ्याच हाऊसिंग सोसायटीमध्ये आजकाल या पद्धतीचा वापर केला जातो ज्यामुळे पाण्याचे बचत नक्कीच होऊ शकते.